# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/04/2023 (सोमवार) दुपार


---

### पो.स्टे. उमरेड हद्दीमधील आय पी एल क्रिकेट सट्टयावर धाड
### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १५/०४/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नागपूर ग्रामीण हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन उमरेड येथील जुना बस स्टॅड परिसरात काही इसम हे IPL मधील रॉयल चॅलेन्जर्स बंगलोर विरूध्द दिल्ली कॅपीटल यांचेमध्ये खेळल्या जाणाऱ्या क्रिकेट सामन्यावर बेटिंग लावण्यावर या प्रकारचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पथकास प्राप्त झाले वरून सदर पथकाने जुना बस स्टॅड परिसरात सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) दुकानाचा मालक राजेश सुरेश भुयारकर, वय ४५ वर्ष रा. आजाद चौक बुधवार पेठ उमरेड आणि २) अक्षय मंगेश महल्ले, वय २५ वर्ष व मंगळवारी पेठ वार्ड क्र २ उमरेड ३) राहुल खुशालराव इंरदांडे वय २९ वर्ष, उमरेड ४)आशिष मनोहर अग्रिहोत्री वय ३६ वर्ष रा. रसोडी वार्ड नं. २४ उमरेड ५) संजय चंद्रभान लेंडे वय ५२ वर्ष रा. इतवारी पेठ वार्ड क्र. ६ उमरेड ६) अनिल आनंदराव झोडे वय ५३ वर्ष रा. मंगळवारी पेठ वार्ड क्र.७ उमरेड** हे मोबाईल फोन व एल ई डी टिव्हीच्या या इलेक्ट्रॉनिक साधनाव्दारे सुरू असलेल्या रॉयल चॅलेन्जर्स बंगलोर विरूध्द दिल्ली कॅपीटल या संघा दरम्यानचा लाईव्ह क्रिकेटच्या सामन्यावर जुगार खेळताना मिळुन आले त्याचे ताब्यातुन ४०७५०/— रूपये रोख रक्कम, ६९०००/— रूपये किंमतीचे एकुण ०५ मोबाईल फोन आणि एक एल ई डी टिव्ही किंमती अंदाजे १००००/—रू. टाटा स्काय सेट टॉप बॉक्स किंमती अंदाजे ३०००/— रू असा एकुण १२२७५०/— रूपयाचा मुदेमाल जप्त करून आरोपींविरूध्द पोलीस ठाणे उमरेड येथे कलम ४/५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवुन आरोपींना जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे उमरेड यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास पोहवा ब नं. ५० गणेश गिरडकर मो. क्र. ७४४७३५५७४९ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधिक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, आशिषसिंग ठाकुर, सहायक फौजदार घडेकर, पोलीस हवालदार अरविंद भगत, दिनेश अधापुरे, पोलीस नायक अजीज शेख, सतिश राठोड, चालक पोलीस हवालदार अमोल कुथे, पोलीस शिपाई आशुतोष यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.


पोलीस स्टेशन, उमरेड
I TRUST NAGPUR RURAL POLICE
I TRUST UMRED POLICE
I TRUST UMRED POLICE

# गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. एम आय डी सी बोरी** :— अंतर्गत इन्डोरामा कंपनी टाकळघाट येथे दिनांक १६/०४/२०२३ चे १४/३० वा. ते १४/४० वा. दरम्यान फिर्यादी नामे— स्वप्नील लिलाधर भोटे, वय ३५ वर्षे रा. शाहु नगर मानेवाडा नागपुर हा सन २०११ पासुन इंडोरामा कंपनी एमआयडीसी बुटटीबोरी येथे मशीन ऑपरेटर म्हणुन काम करतो इंडोरामा कंपनीमध्ये दि. ०६/०४/२०२३ पासुन कामगारांचे कामबंद आंदोलन चालु आहे परंतु फिर्यादीचा त्यामध्ये कोणताही सहभाग नाही. दि. १६/०४/२०२३ रोजी फिर्यादी नेहमी प्रमाणे सकाळी ०५/०० वा. कंपनीचे बसने नागपुर वरून इंडोरामा कंपनीमध्ये ०६/३० वा. कामावर आले असता दुपारी ०२/३० वा. दरम्यान दुपारीची शिफ्ट संपल्याने ०२/४० वा. फिर्यादी कंपनीचे बाहेर उभी असलेली इंडोरामाची बस क्र. ९७७० मध्ये जावुन बसले तेव्हा लगेच फिर्यादीच्या जवळ कंपनीमध्ये काम करणारे यातील **आरोपी नामे— १) चंदा रा. टेंभरी ता. हिंगणा जि. नागपुर २) प्रेमा चौधरी रा. टेंभरी ता. हिंगणा जि. नागपुर ३) मधुमती आपे रा. टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपुर ४) कवडु सावरकर रा. बुटटीबोरी ५) निलेश मोहीतकर रा. बुटटीबोरी ६) खेमराज थेटे रा. बुटटीबोरी ७) विनोद गिरीपुंजे रा. बुटटीबोरी ८) दशरथ पाटील रा. बुटटीबोरी** हे फिर्यादीचे समोर घेराव टाकुन फिर्यादीला पाहुन शिवीगाळ करत होते व चंदा हिने फिर्यादीला ‘‘तु कंपनीतुन किती पैसे खाल्ले आहे आतापासुन कामावर जायचे नाही गेल्यास तुला पाहुन घेवुन’’ असे म्हणुन सर्व आरोपी हे फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करत राहले. त्यांचे पासुन फिर्यादीला धोका असल्याने त्याचे पासुन संरक्षण मिळावे करीता फिर्यादीने पोलीस स्टेशन एम आय डी सी बोरी येथे येवुन रिपोर्ट दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, २९४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोनि. अशोक कोळी मो. क्र. ९६५७८११११ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर